# मार्गशीर्ष महोत्सव २०१७






प्रवचनकार

## स्वामी गोविंददेव गिरि

(आचार्य किशोरजी व्यास)

प्रवचन

## 'देव कुठे रहातो ?'

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०१७
मिती मार्गशीर्ष शुद्ध ३ शके १९३९

मा.महोदय,

सस्नेह नमस्कार वि.वि.

या वर्षीच्या मार्गशीर्ष महोत्सवाचे आमंत्रण देतांना विशेष आनंद होत आहे. बेडेकर उद्योगसमूहाच्या आणि कुटुंबियांच्या दृष्टीने हे वर्ष विशेष महत्त्वाचे आहे.

१९१० साली किराणा मालाच्या दुकानदारीने या व्यवसायाची सुरुवात झाली. १०० - १२५ वर्षांपूर्वीचा तो काळ स्वतंत्र व्यवसाय उभारण्याच्या दृष्टीने फारसा अनुकूल नव्हता असेच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत मोठ्या कष्टाने विश्वनाथ पर्शराम म्हणजेच व्ही.पी.बेडेकरांनी या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. दुकानदारीच्या स्वरुपात असलेल्या या व्यवसायाला पुढे अण्णासाहेब बेडेकरांनी आपल्या अविश्रांत श्रमांच्या बळावर नावारुपाला आणले. १९१७ साली त्यांनी दुकानदारीकडून उत्पादन क्षेत्रात पाऊल टाकले आणि मसाले उत्पादनाची सुरुवात केली. या घटनेला आज १०० वर्षे पूर्ण होत आहेत. पुढे अण्णासाहेबांनी व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. १९४३ साली मूळ व्यवसायाचे प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत रुपांतर केले. या घटनेलाही आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. भविष्यकाळातील स्थैर्य आणि व्यवसायाची प्रगती या दृष्टीने प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची स्थापना हा फारच महत्त्वपूर्ण बदल ठरला.

व्यवसायाप्रमाणेच कौटुंबिक कारणांनीही हे वर्ष विशेष महत्त्वाचे आहे. कंपनीचे संचालक व आमचे बाबा ती.वसंत वासुदेव बेडेकर यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने त्यांनी ऐंद्रशांत करण्याचे योजिले आहे व यासोबत उभयता पती-पत्नीची संयुक्त, स्वकृत रौप्यतुला करण्याचे योजिले आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, शैक्षणिक क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या सुयोग्य व्यक्ती/संस्थांना यानिमित्ताने दानधर्म करण्याचेही त्यांनी ठरविले आहे. पती-पत्नीच्या संयुक्त रौप्यतुलेची उदाहरणे अपवादात्मक आहेत. १९६१ साली श्री. वसंतरावांच्या आईवडीलांची म्हणजे कै. वासुदेवराव व कै.सौ.रखमाबाईची संयुक्त स्वकृत रौप्यतुला झाली होती. आणि आता ५६ वर्षांनी ती. वसंतराव व ती. सौ.रोहिणी बेडेकर यांची संयुक्त स्वकृत रौप्यतुला होत आहे हे सांगतांना आम्हाला अवर्णनीय आनंद होत आहे.

बेडेकर कुटुंबात आणखी एक आनंदाची घटना घडली आहे. आमची धाकटी सून डॉ.सौ.अपर्णा अजित बेडेकर हिच्या समर्थ रामदास स्वामींच्या साहित्यावरील संशोधनात्मक प्रबंधाला मुंबई विद्यापीठाची 'विद्यावाचस्पती' (Ph.D.) ही पदवी देण्यात आली आहे. तिच्या प्रबंधाची समीक्षा करणारी व्याख्याने या वर्षीच्या मार्गशीर्ष महोत्सवात आयोजित करण्यात आली आहेत.

या सर्व आनंदसोहळ्याला आशीर्वाद लाभणार आहेत, परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांचे! स्वामीजींच्या अमृतवाणीद्वारे 'देव कुठे रहातो ?' या प्रवचनमालेच्या श्रवणाचा आनंद आपण सर्वजण घेणार आहेत. श्रीमद्‌भागवत सप्ताह आणि अनेक प्रवचनमालांच्या निमित्ताने परमपूज्य स्वामीजींचे आशीर्वाद गेली ८ वर्षे मार्गशीर्ष महोत्सवातील श्रोत्यांना लाभत आहेत. ही एक पर्वणीच आहे. याशिवाय 'आनंदघन कृष्ण' आणि 'आजि सोनियाचा दिनु' या संगीतमय कार्यक्रमांनी उत्सव रंगणार आहे.

व्यवसायाच्या व कुटुंबियांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या व परमपूज्य स्वामीजींचे आशीर्वाद असणाऱ्या या महोत्सवाची सांगता शनिवार दि. १६ डिसेंबर २०१७ रोजी एका मोठ्या सभेने होणार आहे. या सभेच्या अध्यक्षस्थानी सहकार भारतीचे संस्थापक सदस्य व आताचे पेट्रन (संरक्षक) श्री. सतीश मराठे असणार आहेत. आमचे व्यावसायिक सहकारी, सल्लागार, कर्मचारी, हितचिंतक, नातेवाईक आणि आप्त यांच्या साक्षीने काही गुरुतुल्य व्यक्तींचा सन्मान आणि रौप्यतुलेनंतर करण्यात येणाऱ्या दानाचा प्रतिनिधिक विनियोग या सभेत करण्यात येणार आहे.

आपल्या सर्वांच्या उपस्थितीने हा आनंदसोहळा रंगणार आहे. आपल्या आशीर्वादांसहित, शुभेच्छासंहित आपण सर्वांनी संपूर्ण महोत्सवात अवश्य सहभागी व्हावे, आपले आशीर्वाद खरोखरच बहुमोलाचे आहेत. त्यामुळे आशीर्वादा खेरीज इतर कोणतीही भेटवस्तू किंवा पुष्पगुच्छ कृपया आणू नयेतअशी आग्रहाची विनंती आहे.

कळावे, आपले

**बेडेकर कुटुंबिय**

# कार्यक्रम पत्रिका

| दिनांक | वेळ | कार्यक्रम | वक्ते | विषय |
|---|---|---|---|---|
| रविवार १०.१२.१७ | सायं. ६ ते ८ | प्रवचन | स्वामी गोविंददेव गिरि | देव कुठे राहतो ? |
| सोमवार ११.१२.१७ | सायं. ६ ते ८ | प्रवचन | स्वामी गोविंददेव गिरि | देव कुठे राहतो ? |
| मंगळवार १२.१२.१७ | सायं. ६ ते ८ | प्रवचन | स्वामी गोविंददेव गिरि | देव कुठे राहतो ? |
| बुधवार १३.१२.१७ | सायं. ६.३० | प्रबंध समीक्षा | श्री. प्रकाशजी पाठक डॉ. मंगला सिन्नरकर | अपर्णा बेडेकर यांच्या समर्थांच्या स्फुट साहित्यावरील प्रबंधाची समीक्षा |
| गुरुवार १४.१२.१७ | सायं. ६ .३० | 'आनंदघन -कृष्ण' | सौ. शुचिता आठलेकर, सौ. दीपाली केळकर | भारतीय शास्त्रीय उपशास्त्रीय संगीतातील श्रीकृष्ण |
| शुक्रवार १५.१२.१७ | सायं. ६ .३० | 'आजि सोनियाचा दिनु' | संगीत मंडळी गिरगांवातील कलाकार | संतवाणी |

## आनंदसोहळा

शनिवार,दिनांक १६डिसेंबर २०१७ रोजी सायं. ५.३० वाजता

मसाले उत्पादनाची १०० वर्षे

प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची ७५ वर्षे

संचालक श्री. वसंत बेडेकर यांचा अमृतमहोत्सव

त्या प्रीत्यर्थ करण्यात आलेली रौप्यतुला

**या निमित्त आनंदसोहळा!**

स्थान - बेडेकर सदन पटांगण, मुगभाट, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

बेडेकर

व्ही. पी. बेडेकर ॲण्ड सन्स प्रा. लिमिटेड

५६, घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई-४. ✆:२३८२ ७३२७